# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय उपाहारगृहे
एम-१०, पोटमजला, मंत्रालय विस्तार इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ०२२-२२७९ ३२९३, ०२२-२२७९ ३००१

## सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय उपाहारगृहे कार्यालयांतर्गत गट-ड संवर्गातील वेटर/वाढपी यांची सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांची जाहिरात-सन २०१८

जाहिरात क्रमांक-आस्था २०१५/प्र.क्र.२२१/१५/मंउका दिनांक-२६/२/२०१८

सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृह, विधानभवन उपाहारगृह, चौरस आहारगृह, कोकण भवन उपाहारगृह कार्यालयांतर्गत खाली दर्शविल्याप्रमाणे वेटर/वाढपी या गट-ड संवर्गाच्या रिक्त पदावर सरळसेवेने निवड प्रक्रियेद्वारे भरावयाच्या पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेले उमेदवार अर्ज करु शकतील. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक मकसी-१००७/ प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या ८६५, गावातील रहिवासी असलेले उमेदवार अर्ज करु शकतील.

**<u>पदाचे नाव-वेटर/वाढपी</u>**

पदसंख्या-१३

| जात प्रवर्ग | एकूण पदे | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त | खेळाडू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | - | - | - | - | - | - | - |
| अनुसूचित जमाती | **६** | ३ | २ | १ | - | - | **६** |
| विमुक्त जाती | **१** | १ | - | - | - | - | **१** |
| भटक्या जमाती (ब) | - | - | - | - | - | - | - |
| भटक्या जमाती (क) | **२** | १ | १ | - | - | - | **२** |
| भटक्या जमाती (ड) | **२** | १ | १ | - | - | - | **२** |
| विशेष मागास प्रवर्ग | - | - | - | - | - | - | - |
| इतर मागास वर्ग | - | - | - | - | - | - | - |
| खुला | **२** | १ | १ | - | - | - | **२** |
| **एकूण #** | **१३** | **७** | **५** | **१** | - | - | **१३** |
| # वरील एकूण पदांमध्ये विकलांगाच्या खालील प्रकारासाठी १ पद राखीव आहे [अल्पदृष्टी (LV)/अस्थिव्यंग (OL/BL)/ कर्णबधीर (HH)] | | | | | | | |

**<u>कामाचे स्वरुप-</u>**

अधिकारी/कर्मचारी यांच्या मागणीनुसार खान-पान सेवा देणे, सर्व प्रकारच्या भाज्या साफ करुन कटींग करणे, टेबल साफ करणे, उपाहारगृहातील सर्व प्रकारची भांडी घासून स्वच्छ करणे, उपाहारगृहात साफसफाई, स्वच्छता राखणे.

**२. सुचना-**

२.१)जाहिरातीत नमूद केलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

२.२)समांतर आरक्षणांतर्गत महिला, माजी सैनिक यांचेसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या प्रवर्गातील भरावयाच्या एकूण पद संख्येपैकी आहेत. उर्वरित पदे त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षणाव्यतिरिक्त आहेत. तसेच समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.३) शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक अपंग १००७/प्र.क्र.६१/सुधार-३, दिनांक २० एप्रिल, २००७, शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक न्याय २००७/स.न्या/प्र.क्र.१०३ (भाग-३)/१६अ, दिनांक १९ ऑक्टोंबर, २००७ तसेच शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग १००९/प्र.क्र.२७६/९/१६-अ, दिनांक १९ मार्च, २०१० अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार विकलांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ताक्रमानुसार प्रथम त्याची निवड करण्यात येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.

२.४) वेटर/वाढपी या पदांकरीता वेतनश्रेणी, आवश्यक शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| **वेतनश्रेणी** | रु.४४४०-७४४०, ग्रेड पे रु. १४०० |
| **किमान शैक्षणिक अर्हता** | शासनमान्य संस्थेमधील इयत्ता ४ थी उत्तीर्ण. |

**३) वयोमर्यादा-**

३.१)जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय **दिनांक २७/०२/२०१८ रोजी** गणले जाईल.

३.२)सर्वसाधारण उमेदवाराकरीता वय किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. तसेच मागास प्रवर्गातील उमेदवारांना विहित कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम असेल.

३.३)स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन कर्मचारी, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथिलक्षम राहील.

३.४) सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्र क्रमांक मासैक १०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० नुसार माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील. तसेच विकलांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यन्त राहील.

**४) महिला समांतर आरक्षण-**

४.१) महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक ५२/२००१/ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.२)खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. (शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रमांक संकीर्ण २०१७/प्र.क्र.१९१/१७/कार्या-२, दिनांक १५ डिसेंबर, २०१७)

**५) विकलांग-**

विकलांग प्रवर्गातील उमेदवाराचे विकलांगतेचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रवि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६/१०/२०१२ मधील आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**६) परीक्षा शुल्क-**

सर्वसाधारण (खुला प्रवर्ग) उमेदवारांकरीता रुपये २५०/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये २३५/- परीक्षा शुल्क राहील.

**७) ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सुचना-**

अर्जामध्ये खालील टप्पे आहेत:

१. नोंदणी
२. अर्जावरील माहितीचे पूर्वावलोकन
३. ऑनलाईन शुल्क भरणा
४. अर्जाची प्रिंटआऊट

उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या ‘सूचना’ या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल.

७.१ उमेदवाराचे नाव, वडिलांचे/पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

७.२ छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती :

अ. कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 pixel असलेले छायाचित्र स्कॅन करून अपलोड करावे. छायाचित्राचे आकारमान 20 KB ते 50 KB च्या दरम्यान असावे.

आ. 5x4.5 सेमीचा एक आयत काढा. त्या आयतामध्ये स्वाक्षरी करावी. ती प्रतिमा स्कॅन करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची 60 पिक्सल आणि रुंदी 140 पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते 50 KB च्या दरम्यान असावे.

७.३ पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफीस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी.

७.४ त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने/तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.

७.५ ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी. उमेदवाराकडे आधार क्रमांक नसल्यास त्याने/तिने आधारकरिता नोंदणी करून त्यांचा आधार नोंदणी क्रमांक द्यावा.

७.६ उमेदवारांना अपंग आणि इतर आरक्षणांचा पर्याय पण दिलेला आहे.

७.७ उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी आहे किंवा सीमाप्रांतातील 865 वादग्रस्त गावांतील रहिवासी आहे हे आधी घोषित करावे लागेल.

७.८ शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. उत्तीर्ण परिक्षेत मिळालेले गुण, कमाल गुण, उत्तीर्ण झालेले वर्ष, बोर्ड/विद्यापीठाचे नाव इ. माहिती सुद्धा भरण्यात यावी. त्यानुसार टक्केवारी काढली जाईल.

७.९ एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदारास **पुढे** या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदारांकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील **संपादित** करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

७.१० त्यानंतरचा अर्ज प्रत्येक विभागानुसार आवश्यक त्या माहितीनुसार भरून घेतला जाईल. उमेदवाराला त्यानुसार माहिती द्यावी लागेल.

७.११ पुढे जाण्यासाठी अर्जदाराला **परीक्षा दाखवा** ऑप्शन वर क्लिक करावे लागेल. पुढे अर्जदाराने अर्ज करण्यासाठी “वेटर/वाढपी - २०१८"हा पर्याय निवडणे आवश्यक आहे त्यानंतर त्यास प्रोसिड या बटनावर क्लिक करावे लागेल.

७.१२ उमेदवाराने जर कोणतेही शैक्षणिक माहिती दिली नसल्यास त्याला " उमेदवार कमीत कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण आहे का?" हे विचारले जाईल .

७.१३ व्यावसायिक पात्रता मध्ये, अर्जदाराने व्यावसायिक शिक्षण घेतले असल्यास त्याबद्दल माहिती भरू शकतो.

७.१४ उमेदवार नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो.

७.१५ यानंतर उमेदवाराने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाइन शुल्क भरावे.

७.१६ उमेदवाराने सगळ्या नियम व अटी वाचून मान्यता दर्शवण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे.

७.१७ मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल.

७.१८ उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

७.१९ **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन** :

अ. युजरनेम आणि पासवर्ड वापरून लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

आ. अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्ह्यू" या पर्यायावर क्लिक करा.

७.२० **ऑनलाईन भरणा:**

उमेदवार क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/एटीएम पिन/इंटरनेट बँकिंग/वॅलेट/कॅश कार्ड/आयएमपीएस द्वारे शुल्क भरणा करू शकतात.

अ. उमेदवार आपापल्या सोयीनुसार भरणा करू शकतात.

आ. भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत.

इ. उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडित झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगइन करून भरणा प्रक्रिया पूर्ण करावी.

ई. शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला "भरणा यशस्वी" म्हणून संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

७.२१ **अर्जाची प्रिंट**

अ. उमेदवाराने अर्जाची एक प्रत आपल्याकडे ठेवावी.

आ. अर्ज मंत्रालय उपाहारगृहे कार्यालयाकडे जमा करण्याची आवश्यकता नाही.

७.२२ **नोंदणी व अर्ज भरण्यासाठीचा कालावधी —**

पात्र उमेदवारांना www.mahapariksha.gov.in या वेबसाईटद्वारे दि.२८.०२.२०१८ ते दि.१८.०३.२०१८ या कालावधीमध्ये वेब बेस (Web-Based) ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहिल.

**८) उमेदवाराची गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी निवड झाल्यानंतर संबंधीत नियुक्ती अधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशिल -**

८.१ शैक्षणीक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा पुरावा (शासनमान्य संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्राची प्रत),

८.२ जन्मतारखेबाबत पुराव्याच्या दाखल्याची प्रत (शाळा सोडल्याचा दाखला/जन्म प्रमाणपत्र),

८.३ जातीच्या दाव्यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमाणपत्र

८.४ महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत,

८.५ लागू असल्यास आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य, प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

८.६ लागू असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या नॉन क्रिमेलेअर प्रमाणपत्राची प्रत.

८.७ विकलांग व्यक्तीचे बाबतीत उपरोक्त अ.क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रमाणपत्राची प्रत.

८.८ परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत व आवेदन पत्राची प्रत.

८.९ माजी सैनिक उमेदवाराने सशस्त्र दलात केलेल्या सेवेबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत

८.१० इतर अनुषंगीक आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रती.

८.११ खालील दिलेल्या नमुन्यातील लहान कुटुंबाबाबतचे प्रमाणपत्र

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना-अ (नियम-४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी ..............................................................................
श्री. ....................................................... यांचा मुलगा/यांची मुलगी/यांची पत्नी वय ...........वर्ष,
राहणार ..................................................................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी .......................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ....................................(संख्या) इतकी हयात मुले आहे. त्यापैकी दि.२८ मार्च, २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ........................ आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला असलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : उमेदवाराची सही

## ९) निवडीची पध्दत :

| पदाचे नाव | तपशिल |
|---|---|
| वेटर/ वाढपी | १. वेटर/वाढपी या पदासाठी फक्त मराठी माध्यमातून लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br>२. लेखी परीक्षेद्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल.<br>३. लेखी परिक्षेद्वारे घेण्यात येणारी परीक्षा ५० प्रश्नांची व १०० गुणांची घेण्यात येईल. परीक्षेचा कालावधी एक तासाचा राहिल.<br>४. लेखी परिक्षेद्वारे घेण्यात येणारी परीक्षा, मराठी भाषा-१० प्रश्न, सामान्य ज्ञान-२० प्रश्न, बौध्दीक चाचणी-२० प्रश्न, अशा एकूण ५० प्रश्नांची राहिल. प्रत्येक प्रश्नास दोन गुण राहिल. प्रश्नपत्रिका, वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.<br>५. मराठी, सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी परीक्षेचा दर्जा सर्वसाधारण अभ्यासक्रमावर आधारित राहील.<br>६. प्रश्नांची काठीण्य पातळी २०:३०:५० अशी अनुक्रमे सोपे, मध्यम व कठीण याप्रमाणे राहील.<br>७. लेखी परीक्षा मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे शहर व नवी मुंबई परिक्षेत्रात घेण्यात येईल. |

९.१ पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र, परीक्षा केंद्र व परीक्षेविषयी आवश्यक सुचना ऑनलाईन व एसएमएसद्वारे कळविण्यात येईल व www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन डाऊनलड करावीत. लेखी परीक्षेनंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादी www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

९.२ शासन निर्णय क्रमांक:प्रनिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१२-अ, दि.२७.०६.२००८ नुसार जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशाच उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करण्यात येईल.

९.३ लेखी परीक्षेमध्ये उमेदवारास समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२७.०६.२००८, दि.०५.१०.२०१५ व शासन पूरकपत्र दि.०२.१२.२०१७ मधील तरतूदीनुसार निवड प्रक्रीयेची कार्यवाही करण्यात येईल.

९.४ गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी ऑनलाईन आवेदनपत्रात सादर केलेल्या माहितीनुसार मुळ कागदपत्रांची पडताळणी मंत्रालय उपाहारगृहे कार्यालयाकडून करुनच नियुक्ती देण्यात येईल. पडताळणीत चुकीची, अपुर्ण अथवा खोटी माहिती आढळून आल्यास कोणत्याही टप्यावर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

९.६ लेखी परीक्षेसाठी उमेदवारांना परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**<u>१०) इतर अटी व शर्ती :-</u>**

१०.१ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१०.२ उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या आवेदन पत्रातील माहितीच्या आधारे लेखी परीक्षेस बसण्यास तात्पुरती परवानगी देण्यात येईल व निवड झाल्यानंतर प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेस ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जातील माहिती अपुर्ण अथवा चुकीची/खोटी आढळून आल्यास उमेदवाराची निवड त्या टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१०.३ मागासवर्गीयांसाठी असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्यांसाठी लागू राहिल व सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे आवश्यक राहिल. तसेच जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास सादर करणे आवश्यक राहील.

१०.४ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड तसेच इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू करण्यात आले असल्याने, त्याबाबतचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र) (सन २०१७-२०१८ साठी वैध असलेले) सादर केल्याशिवाय नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

१०.५ माजी सैनिक या आरक्षित पदासाठी उमेदवार स्वत: माजी सैनिक असावा.

१०.६ सामाजिक आरक्षणांतर्गत असलेले महिला, खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त या प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

१०.७ उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबंधित पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सबंधित उमेदवार कायदेशिर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना/नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणाऱ्या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

१०.८ नियुक्तीस पात्र ठरलेल्या मागासप्रवर्गातील उमेदवारांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार नियुक्तीपासून ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१०.९ नियमित नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारास नवीन परीभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल.

१०.१० महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये उमेदवारांनी दि.२८.०३.२००५ रोजी ह्यात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत मुद्दा क्रमांक ११.१३ मध्ये नमुद केल्यानुसार प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार यांना ह्यात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दि.२८.०३.२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी उमेदवार निवडीस/नियुक्तीस अपात्र ठरविला जाईल.

१०.११ उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

११) निवड प्रक्रीयेच्या संदर्भात सर्व अधिकार संबंधित निवड समितीने राखून ठेवले आहेत.

१२) निवड प्रक्रीयेच्या संदर्भात समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१३) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दि.१८.०३.२०१८ असून त्या दिनांकास रात्री २३.५९ वाजता ऑनलाईन अर्ज स्विकृती बंद करण्यात येईल.

१४) सदरची जाहिरात राज्य शासनाच्या महापरीक्षा कक्षाच्या www.mahapariksha.gov.in व www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

स्थळ : मुंबई

दिनांक : २६/०२/२०१८

**महाव्यवस्थापक,**
**मंत्रालय उपाहारगृहे,**
**सामान्य प्रशासन विभाग**
**मंत्रालय, मुंबई**